दै. तरुण भारत २५/७/९८



# कमला कॉलेजमध्ये एड्सवर व्याख्यान संपन्न

कोल्हापूर, दि. २४ - एड्स् हा विसाव्या शतकातील महाभयंकर रोग असून त्याचे निर्मूलन होण्यासाठी जनजागृती मोहीम सर्वांनी हाती घेण्याची गरज आहे, असे मत डॉ. नानीवडेकर यांनी व्यक्त केले.

येथील कमला कॉलेज येथे रोटरी क्लब, हळदीकर प्रतिष्ठान व जनस्वास्थ्य दक्षता समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'एड्स् व गुटखा' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील होते.

यावेळी बोलताना डॉ. देवलापूर यांनी समाजातील तरुण पिढीने या व्यवसनापासून दूर राहिले तरच देशाची प्रगती होईल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ. टी. पी. पाटील यांनी केले. तर सौ. व्ही. व्ही. मैंदर्गी यांनी आभार मानले.